# वृत्तपत्र टिप्पणी

## महानिर्मितीच्या कोराडी येथील संच क्र. ६ चे आधुनिकीकरण होणार
## महानिर्मिती व मे. भेल यांच्यात नागपूर येथे करारनामा संपन्न

**नागपूर (दि. १८-१२-२०१३) :**

सुमारे ३१ वर्षे इतके आयुर्मान पूर्ण झालेल्या महानिर्मितीच्या कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील २१० मेगावॅट क्षमतेच्या संच क्र ६ चे पूर्णतः नूतनीकरण व आधुनिकीकरण (R&M) करण्या संबंधीचा एक महत्वपूर्ण करारनामा नागपूर येथे आज महानिर्मिती व भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लि. (मे. भेल) यांच्यात संपन्न झाला. सदर प्रसंगी राज्याचे मा. ना. उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रधान सचिव (उर्जा) मा. अजय मेहता, महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक मा. आशीष शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती. कोराडी परिसरातील पर्यावरण संवर्धनाचे दृष्टिकोनातून महानिर्मितीचे हे पाऊल महत्वपूर्ण भूमिका बजावणार आहे.

या प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना मा.ना. उपमुख्यमंत्री यांनी राज्याने वीज निर्मिती क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची उपस्थितांना माहिती दिली. कोळसा टंचाईच्या विपरीत परिस्थितीत देखील महानिर्मिती मोलाची कामगिरी बजावत असून देखील अनेकदा महानिर्मितीवर अकार्यक्षमतेचे चूकीचे आरोप केले जातात असे त्यांनी निदर्शनास आणले. संबंधित प्रसार माध्यमांनी प्रत्यक्ष वस्तुस्थितीची माहिती घेऊन वृत्तांकन केल्यास ते राज्यातील वीज ग्राहकांच्या हिताचे राहील असे मत प्रदर्शन केले.

केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने सदर नूतनीकरणाचे कामास मंजुरी दिली असून अशा प्रकारचे ऊर्जा कार्यक्षमता वाढविण्याचे काम केले जाणारा २१० मेगावॅटचा सदर संच हा राज्यातील पहिलाच संच आहे. एकूण सुमारे ४८६ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पासाठी जागतिक बँकेने त्यांपैकी सुमारे रु. ३६० कोटीस (सुमारे ७४%) इतक्या वित्तीय सहाय्याची तरतूद केली असून राज्य शासनाकडून भागभांडवलाचे सुमारे ९६ कोटी रुपये तर महानिर्मितीचा वाटा सुमारे रु. ३० कोटी इतका असणार आहे. अकराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने अशा कामासाठी मंजुरी दिलेल्या महानिर्मितीच्या अन्य संचामध्ये नाशिक संच क्र. ३, परळी संच क्र. ३, भुसावळ संच क्र. २ तसेच चंद्रपूर येथील संच क्र. १ व २ चा समावेश आहे.

औष्णिक विद्युत केंद्राचे आयुर्मान साधारणतः सरासरी २५-३० वर्षे इतके असते. महानिर्मितीच्या बहुतांशी जुन्या संचांनी हे आयुर्मान पूर्ण केले असल्याने त्यांची कार्यक्षमता कालपरत्वे कमी झालेली आहे. तथापि, नवे वीजप्रकल्प उभारणीसाठी लागणारी प्रचंड भांडवली गुंतवणूक तसेच पुरेशी जमीन, पाणी इ. संसाधनांची मर्यादित उपलब्धता, हे घटक लक्षात घेता जुन्या कार्यरत संचांचे नव्या तंत्रज्ञानाने युक्त असे नूतनीकरण-आधुनिकीकरण (R&M) केल्यास त्या संचाचे आयुर्मान सुमारे १५-२० वर्षांनी वाढते तसेच त्यातून होणारी वीजनिर्मितीदेखील वाढणार आहे. कोराडी संच क्र. ६ चे काम हे या अर्थाने महानिर्मितीसाठी पथदर्शी ठरणार आहे. सदर कामासाठी महानिर्मितीला कोणतीही अतिरिक्त जमीन, पाणी यांची आवश्यकता नसून कामासंबंधित सर्व परवानग्या महानिर्मितीला प्राप्त झालेल्या आहेत.

सदर काम पूर्ण झाल्यानंतर आवश्यक प्रमाणात योग्य दर्जाचा कोळसा उपलब्ध झाल्यास सुधारीत कार्यक्षमतेमुळे संचाची उपलब्धता व भारांक (PLF) लक्षणीय प्रमाणात वाढू शकतो. याशिवाय महत्वाची बाब म्हणजे ही वाढीव वीजनिर्मिती साध्य होत असताना संचाच्या चिमनीतून उत्सर्जित राखेचे प्रमाण निर्धारित मर्यादेपेक्षा बऱ्याच कमी प्रमाणात (सुमारे ७० पी.पी.एम.) इतके राखण्यात यश मिळणार असून परिसरातील पर्यावरण संवर्धनास ते उपयुक्त ठरणार आहे.

सध्या देशात कोळसा टंचाईची समस्या असून महानिर्मितीला कोळसा टंचाई बरोबर प्राप्त कोळशाच्या दर्जाचीही समस्या त्रस्त करीत आहे. नूतनीकरणाचे कामानंतर प्राप्त कोळशाच्या गुणवत्तेनुसार बाष्पकाचे डिझाईन केले जाणार असून संचाची विश्वसनीयता आणि कार्यक्षमता या कामामुळे वृध्दिंगत होणार आहे.

नवे वीज प्रकल्प उभारण्यासाठी किमान ३-४ वर्षांचा कालावधी आवश्यक असतो. त्या तुलनेत सदर संचाच्या नूतनीकरण-आधुनिकीकरणाचे काम प्रत्यक्ष काम सुरु केल्यानंतर सुमारे ८ महिन्यांत पूर्ण होऊ शकते. महानिर्मितीने साधारणतः मे २०१५ पासून हे काम प्रत्यक्ष हाती घेण्याचे नियोजन केले आहे.

या नूतनीकरण-आधुनिकीकरण कामातील बॉयलर-टर्बाईन-जनरेटर (बी.टी.जी.) पॅकेजचे मुख्य काम मे. भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लि. या सरकारी उपक्रमास देण्यात आलेले असून अन्य संयंत्र उभारणीचे काम मे. टेकप्रो यांना तर विद्युत प्रणाली उभारणीचे काम मे. ए.बी.बी. यांना देण्यात आलेले आहे.

या प्रसंगी महानिर्मिती व मे. भेल यांनी सादरीकरण करून सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. तसेच कार्यक्रमाचे शेवटी उपस्थित पत्रकार बांधवांच्या शंकांचे मा. उपमुख्यमंत्री महोदय यांनी निरसन केले. महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प) मा. चंद्रकांत थोटवे, संचालक (संचलन) मा. विजय सिंग, प्रभारी संचालक (वित्त) मा. जे के श्रीनिवासन, कार्यकारी संचालक (सं व सु) अनिल नंदनवार, कार्यकारी संचालक (मा.सं.) मनोज रानडे व मे.भेल (BHEL) तर्फे कार्यकारी संचालक राजीव श्रीवास्तव, एस.सी. जैन, महाव्यवस्थापक सर्वश्री एस. घोष, एच.के. गायकवाड, के.एन. राम, जयमान मिंज हे उपस्थित होते. तसेच सदर कार्यक्रमास महानिर्मिती व मे. भेलचे अन्य वरिष्ठ अधिकारी व नागपूर मधील पत्रकार बंधू मोठया संख्येने उपस्थित होते.